**<u>ठळक बातम्या</u>**

- शिक्षक दिन हा शिक्षकांचं समर्पण, योगदान आणि मार्गदर्शनाप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन/ राज्य शिक्षक पुरस्कारांचं केलं वितरण

- राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारांचं वितरण आज राष्ट्रपतींच्या हस्ते / महाराष्ट्रातल्या २ शिक्षकांचा पुरस्कारविजेत्यांमधे समावेश

- राज्यशासनाच्या आरोग्याची वारी पंढरीच्या दारी या शिबिराची इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड्समधे नोंद

**आणि**

- चौथी हॉकी इंडिया आंतरविभागीय स्पर्धा आजपासून पुण्यात सुरु होणार

**<><><><><>**

शिक्षक दिन हा शिक्षकांचं समर्पण, योगदान आणि मार्गदर्शनाप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. मुंबई इथं आयोजित क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार सोहळ्यात ते आज बोलत होते. खडू आणि छडीच्या जोरावर आयुष्याची शिडी चढायला शिकवणाऱ्या सर्व शिक्षकांना मुख्यमंत्र्यांनी शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. देशात जीडीपीचं योगदान, प्रगतीचं केंद्र, परदेशी गुंतवणूक, स्वच्छता, उद्योग या सगळ्यात आपलं राज्य सर्वप्रथम आहे. आपलं राज्य शैक्षणिक दर्जातही सर्वोत्तम व्हावं यासाठी आपण साऱ्यांनी प्रयत्न केला पाहिजे. शैक्षणिक दर्जा

सुधारण्याच्या दृष्टीनं सरकार नेहमीच प्रयत्नशील राहील असंही मुख्यमंत्री म्हणाले. यावेळी त्यांनी सर्व पुरस्कार विजेत्या शिक्षकांचं अभिनंदन केलं. या कार्यक्रमात १०९ शिक्षकांना पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं. यामध्ये प्राथमिक विभागातले ३८ शिक्षक, माध्यमिक विभागातले ३९ शिक्षक, आदिवासी क्षेत्रात उत्कृष्ट काम करणारे १६ शिक्षक, कला आणि क्रीडा क्षेत्रातले २ विशेष शिक्षक, दिव्यांग किंवा दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शाळेतले एक आणि स्काऊट गाईड मधले दोन तसंच ८ शिक्षिकांना आदर्श शिक्षिका पुरस्कार देण्यात आले.

**<><><><><>**

देशभरात आज शिक्षक दिवस साजरा होत असून यानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. दरवर्षी ५ सप्टेंबर हा माजी राष्ट्रपती डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस, राष्ट्रीय शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. शालेय शिक्षण क्षेत्राचा दर्जा उंचावण्याबरोबर विद्यार्थ्यांचं आयुष्य समृद्ध करण्यासाठी योगदान दिलेल्या ८२ शिक्षकांना आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पुरस्कार दिले जाणार आहेत. राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार मिळालेल्यांमध्ये **कोल्हापूर** जिल्ह्यातले कलाशिक्षक सागर बगाडे आणि **गडचिरोली** जिल्ह्यातले मंतैय्या बेडके यांचा समावेश आहे. या पुरस्काराचं स्वरूप ५० हजार रुपये रोख, रौप्य पदक आणि प्रशस्तीपत्र असं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शिक्षकदिनानिमित्त सर्व शिक्षकांना शुभेच्छा दिल्या आहेत. कोवळ्या मनाला घडवणाऱ्या सर्व शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस, असल्याचं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक विकासाबरोबर त्यांना सुजाण आणि जबाबदार नागरिक म्ह्णून घडवण्यात शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्वाची असल्याचं प्रधानमंत्र्यांनी शिक्षकांना लिहिलेल्या पत्रात

म्हटलं आहे. पारंपरिक ज्ञान आणि आधुनिक शिक्षण पद्धतीची योग्य सांगड घालून भारत जगभरात ज्ञानाचं  उत्कृष्ट केंद्र म्हणून उदयास येत आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

महाराष्ट्र शासनानं महिला आर्थिक सक्षमीकरणासाठी दमदार पावलं उचलून महिला सक्षमीकरणाचा नवा आदर्श देशापुढे ठेवला आहे, अशा शब्दात राष्ट्रपतींनी राज्यातल्या महिला विकासाच्या योजनांचं कौतुक केलं. महाराष्ट्राच्या लातूर जिल्ह्यात उद्गीर इथं महिला सक्षमीकरण मेळाव्यात त्या काल बोलत होत्या. महिलांनी आपल्या आरोग्यावर लक्ष केंद्रीत करावं, आपल्या आणि कुटुंबाच्या भविष्यासाठी स्वत:कडे देखील लक्ष द्यावं, असं आवाहन राष्ट्रपतींनी यावेळी केलं.

**बाईट- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू**

***''प्रायः मातायें और बहनें परिवार के स्वास्थ का ध्यान तो देती है, लेकिन अपने भोजन और स्वास्थ का ध्यान नही रखती है। मै सभी बहनों से कहना चाहती हूं, की आप लोग अपने स्वास्थ पर भी ध्यान दें। बच्चों और परिवार की देखभाल करने मे अपने स्वास्थ को अनदेखा नही करना है। आपको आपने और आपके परिवार के भविष्य के लिये भी अपने स्वास्थ का ध्यान रखना होगा।''***

या कार्यक्रमाला राज्यपाल सी पी राधाकृष्णन, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, लातूरचे पालकमंत्री गिरीष महाजन, मंत्री संजय बनसोडे, महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे उपस्थित होते.

या कार्यक्रमात राष्ट्रपतींच्या हस्ते मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण, तसंच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या लाभार्थ्यांना निधीवाटप करण्यात आलं.

<><><><><>

भारतीय अर्थव्यवस्थेत सुमारे १६० अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या गुंतवणुकीसह सिंगापूर हा भारताचा प्रमुख आर्थिक भागीदार असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ब्रुनेईचा यशस्वी दौरा आटोपल्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी काल सिंगापूर इथं पोहोचले. त्यानंतर मोदी आणि सिंगापूरचे प्रधानमंत्री लॉरेन्स वोंग यांच्यात आज शिष्टमंडळ स्तरावरील चर्चेनंतर भारत आणि सिंगापूर दरम्यान आरोग्य आणि औषध, शिक्षण आणि कौशल्य विकास, डिजिटल तंत्रज्ञान आणि भारत-सिंगापूर सेमीकंडक्टर परिसंस्था भागीदारी या क्षेत्रातील सहकार्यासाठी चार सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. त्यानंतर मोदी बोलत होते.

<><><><><>

गेल्या दहा वर्षांत भारताची सौर उर्जा क्षमता ३२ पटींनी वाढली असून हा वेग कायम राहिला तर २०३०पर्यंत देश ५०० गिगा वॅट इतकी सौर उर्जा निर्मिती करेल, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. नवी दिल्ली इथे आयोजित दोन दिवसांच्या पहिल्या आंतरराष्ट्रीय सौर महोत्सवाला प्रधानमंत्री मोदी यांनी व्हिडीओ संदेशाद्वारे संबोधित केलं.

<><><><><>

महाराष्ट्र राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सुरू झालेल्या आरोग्याची वारी पंढरीच्या दारी या शिबिराचा लाभ यंदा आषाढी वारी करणाऱ्या १५ लाखांपेक्षा अधिक वारकऱ्यांनी घेतला. त्यामुळे या आरोग्य शिबिराची नोंद इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड्समधे झाली आहे. या शिबिराची संकल्पना राज्याचे आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत यांची आहे. आषाढी वारीच्या पालखी मार्गांवर तसंच पंढरपूर इथे या

शिबिराचं आयोजन केलं गेलं. या शिबिरात साडे सात हजार आरोग्य कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला होता.

<><><><>

जातीव्यवस्था कायम राखण्याचा भाजपाचा उद्देश असल्याचा आरोप लोकसभेतले विरोधीपक्षनेते राहुल गांधी यांनी केला आहे. सांगली जिल्ह्यात कडेगाव इथं काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी आमदार दिवंगत पतंगराव कदम यांच्या स्मारकाचं आणि पुतळ्याचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांनी आज नांदेड जिल्ह्यात नायगाव इथं काँग्रेसचे दिवंगत खासदार वसंतराव चव्हाण यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन, सांत्वन केलं.

<><><><>

महानुभाव पंथाचे संस्थापक, चक्रधर स्वामी यांच्या जयंती दिनानिमित्त राज्यात विविध कार्यक्रमातून आदरांजली वाहण्यात येत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात चक्रधार स्वामींना नमन केलं आहे.

<><><><>

वाशीम इथं प्रौढांना क्षयरोग प्रतिबंधक बीसीजी लसीकरण मोहीम राबवण्यात येत असून याअंतर्गत झालेल्या शिबिरात ज्येष्ठ नागरिकांचं लसीकरण पूर्ण करण्यात आलं. या मोहिमेत ६० वर्षावरील सर्व व्यक्तींना लस देण्यात आली.

<><><><>

**नंदुरबार** शहरातल्या एक शाळेत पाचवीच्या विद्यार्थीनीचा विनयभंग झाल्या प्रकरणी आज सकल मराठा समाजाच्या वतीने मूक मोर्चा काढण्यात आला. गेल्या आठवड्यात झालेल्या या घटनेचे तीव्र पडसाद शहरात उमटत आहेत. या प्रकरणी पोलीसांनी एका आरोपीला अटक केली असून त्याची रवानगी कोठडीत झाली

आहे. मात्र यात शाळा मुख्याध्यापक आणि संचालकांवर गुन्हा दाखल झाल्यानंतर ते फरार आहेत.

<><><><><>

गडचिरोली जिल्ह्यात एका दारूविक्रेत्याच्या घरी काल पोलिसांनी छापा मारला आणि त्याच्याकडून २१ लाख ८० हजार रुपयांची रोख आणि देशी दारूचा साठा जप्त करण्यात आला.

<><><><><>

वरीष्ठ पुरुष गटासाठीची चौथी हॉकी इंडिया आंतरविभागीय स्पर्धा आजपासून महाराष्ट्रात पुणे इथं सुरू होत आहे. या स्पर्धेत देशभरातले १८ संघ सहभागी होणार आहेत. टोक्यो ऑलिम्पिक खेळलेले सुरेंदर कुमार, आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेता आकाशदीप तसंच ऑलिम्पियन धरमवीर आणि दिलप्रीत सिंग यांच्यासह अनेक नामवंत खेळाडू यात सहभागी होणार आहेत.

<><><><><>

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आगमन आणि विसर्जनासाठी मुंबई महानगरपालिका सज्ज झाली आहे. चौपाटयांसह गणेश विसर्जन स्थळे, कृत्रिम तलाव या ठिकाणी पालिकेच्या वतीने सर्व सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. यंदा ६९ नैसर्गिक स्थळांबरोबरच २०४ कृत्रिम तलाव तयार करण्यात आले आहेत. याशिवाय विभाग स्तरावर फिरती विसर्जन स्थळे, तसेच गणेश मूर्ती संकलन केंद्रे आदी सुविधा पुरविण्यात आल्या असल्याची माहिती पालिका प्रशासनाने दिली.

//<><><><><>//